स्वातंत्र्यसेनानी, पद्मभूषण

# डॉ. नागनाथअण्णा नायकवडी

रघुराज मेटकरी

तेजश्री
प्रकाशन

• स्वातंत्र्यसेनानी, पद्मभूषण डॉ. नागनाथअण्णा नायकवडी

रघुराज मेटकरी
मो.नं. ९८५०४८२१५३



© सौ. रेखा रघुराज मेटकरी
'राजहिरा', अहिल्यादेवी नगर,
मु. पो. विटा, ता. खानापूर,
जि. सांगली - ४१५३११



• प्रकाशक :
दादासाहेब काका जगदाळे
तेजश्री प्रकाशन
महालिंग मळा, यशवंत कॉलनीजवळ
मु. पो. कबनूर, ता. हातकणंगले,
जि. कोल्हापूर - ४१६ १३८.
मोबा. ८२७५६३८३९६

• मुखपृष्ठ :
सागर संपतराव कांबळे, विटा

• मुद्रक
भारती मुद्रणालय
८३२ ई, शाहूपुरी ४ थी गल्ली, कोल्हापूर ४१६ ००१
फोन : (०२३१) २६५४३२९

• प्रथम आवृत्ती : २५ डिसेंबर, २०२२

ISBN : 978-93-94617-17-9

• मूल्य : रु. १००/-

# भाग एक

माणसाने नीतिमान असावे. माणसाने सदाचारी असावे. माणसाने देशभक्त असावे. माणसाने मातृभक्त असावे. माणसाने समाजसेवक असावे. माणसाने लोकसेवेसाठी क्षणक्षण आणि कणकण झिजावे. असे वागणारा लोकोत्तर महापुरुष असतो. नागनाथअण्णा नायकवडी असे महापुरुष होते. आपले संपूर्ण जीवन त्यांनी लोकार्पण केले. अनंत ज्ञानी, अनंत सुखी, अनंत दर्शनी, अनंत सामर्थ्यशाली सर्वांचे सर्वांग सुंदर प्रकटीकरण म्हणजे क्रांतिवीर नागनाथअण्णा होते. जगातील सामर्थ्यशाली सेनापतीशी ज्यांची तुलना होईल अशी चैतन्याची मूर्ती म्हणजे पद्मभूषण डॉ. नागनाथअण्णा होते. शौर्याचा, धैर्याचा, संघर्षाचा आणि कर्तृत्वाचा महामेरू म्हणजे जनतेचे लाडके नेते नागनाथअण्णा होते. त्यांचे चरित्र म्हणजे लयबद्ध गाणे आहे. ते आपण मुलांनो गाणार आहोत. यातून तुमच्या हृदयात देशभक्तीचा स्फूर्तीचा झरा निर्माण व्हावा यासाठी केलेला हा प्रयत्न आहे.

नागनाथअण्णा भारतमातेचे पुत्र होते. २००८ साली त्यांना शिवाजी विद्यापीठाने डॉक्टरेट देऊन सन्मानित केलेले होते. तर भारताच्या राष्ट्रपती महामहिम डॉ. प्रतिभाताई पाटील यांनी २००९ साली अण्णांना 'पद्मभूषण' किताब देऊन गौरविलेले होते. अण्णांना गौरवाची, सत्तेची, पदाची हाव कधीच नव्हती. मात्र लोकसेवेची प्रचंड हौस त्यांना होती. सर्वसामान्य माणसाचे जीवन समृद्ध झाले पाहिजे. फाटक्या-तुटक्या माणसाचा इतिहास बनला पाहिजे. प्रत्येक माणसाला सुखाचे, समाधानाचे चार घास स्वकष्टाने रोजच्या रोज मिळाले पाहिजेत हे त्यांचे स्वप्न होते. या स्वप्नाच्या पूर्ततेसाठी ते जगले. भारतमातेच्या गोरगरीब मुलांचा विकास आणि समाजाचे परिवर्तन यासाठी अण्णांची वाटचाल होती. प्रत्येक मुलगा आणि मुलगी शिकलीच पाहिजे. प्रत्येक कष्टकऱ्याला जमीन मिळाली पाहिजे. प्रत्येक माळरानात नदीचे पाणी खेळले पाहिजे यासाठी प्रत्येक श्वास त्यांनी खर्ची टाकला.

इंग्रजांच्या ताब्यात असलेला भारतदेश स्वतंत्र व्हावा म्हणून अण्णांनी आपल्या